ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ३० जानेवारी, १९५२ | अंक ५

## विविध माहिती

**म्हैसूर मधील सहकारी शेतें**—पडीक जमीन लागवडीस आणण्यासाठीं म्हैसूर सरकारनें सहा सहकारी पद्धतीचीं शेतें स्थापन केली आहेत. भारत सरकारनें अन्न-बोनस म्हणून जी मदत देण्याचें ठरविलें आहे त्यांतून २,२०,००० रुपये भांडवल म्हणून वरील शेतांना देण्यांत येणार आहेत. यत्या चार वर्षांत सुमारें ६,५७० एकर सरकारी मालकीची जमीन सहकारी शेती पद्धतीनें लागवडीस आणण्यांत येणार आहे.

**हिंदुस्थान शिपयार्ड लिमिटेड**—हिंदुस्थान शिपयार्ड लिमिटेड ही सरकारी व खाजगी भांडवलाची संमिश्र कंपनी नुकतीच स्थापन करण्यांत आली. कंपनीचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपये असेल. सध्याच्या कंपनीची मालमत्ता व देणें नव्या कंपनीनें आपल्याकडे घेतल्यावर तिचें खपलेलें भांडवल ३ कोटी रुपये होईल. त्यापैकीं सरकारच्या मालकीचें भांडवल दोन तृतियांश आणि शिंदया कंपनीचें एक तृतियांश राहील.

**जपान एंजिनें पुरविण्यास तयार**—भारत सरकारनें जपान कडून १० अश्वशक्तींहून कमी शक्तीचीं डिझेल एंजिनें आयात करण्याची परवानगी दिल्याचें समजतें. जपान भारताला इतर अनेक प्रकारची यंत्रसामग्री पुरविण्यास उत्सुक आहे, अशीहि वार्ता आहे.

**सहकारी वीज-पुरवठा केंद्र**—डहाणू येथील सहकारी सोसायटीनें आपल्या खर्चानें विजेचें पुरवठा केंद्र बांधलें आहे. त्याचा उद्‌घाटन समारंभ मुंबई-सरकारचे अर्थमंत्री ना. वैकुंठराय मेहता ह्यांचे हस्तें ता. ३१ जानेवारी रोजीं होणार आहे. पॉवर हौस बांधण्यासाठीं जवळ जवळ ६ लाख रुपये खर्च आला.

**वैमानिक प्रवासाचे दर**—विमानाला लागणाऱ्या पेट्रोलच्या किंमतींत दर गॅलनमागे ४ आण्यांची वाढ झाल्यामुळें, वैमानिक प्रवासाच्या दरांत वाढ होण्याचा संभव निर्माण झाला होता. हे दर फक्त पेट्रोलच्या किंमतीवरच आधारलेले नसतात. त्यामुळें इतक्यांतच त्यांत वाढ होणार नाहीं, असें समजतें.

**टेलिप्रिंटरसाठीं लिपी**—कांहीं अरब राष्ट्रांनीं एकत्र जमून ५३ अक्षरांची आणि कांहीं समासांची एक लिपी तयार केली आहे. अरबी भाषेंत नेहमीच्या प्रचारांत ३०० अक्षरें आहेत. टेलिप्रिंटरवर संदेश व वृत्त पाठविण्यास सोपें जावें म्हणून हा प्रयत्न करण्यांत आला आहे. रोजच्या व्यवहारांत तिचा उपयोग करण्यांत येणार नाहीं.

**कानपूर शहरांत शांतिमंदिर**—कानपूर येथील जी. एन्. के. कॉलेजमध्यें जागतिक शांततेसाठीं प्रार्थना करण्यासाठीं एक दिवस पाळला गेला. ह्या प्रसंगीं एक शांतिमंदिर उभारण्यासाठीं उत्तर-प्रदेश राज्याच्या मजूर मंत्र्यातर्फे एका देणगीची घोषणा करण्यांत आली. देणगी श्री. वेणीमाधव खन्ना ह्यांनीं दिली आहे. कॉलेजच्या आवारांतच १ लाख रुपयांच्या देणगींतून वरील मंदिर बांधण्यांत येणार आहे.

**अमेरिकेला अल्युमिनम पाहिजे**—अमेरिकेला संरक्षणाची तयारी करण्यासाठीं अधिक अल्युमिनमची जरूरी असल्यानें तिनें कॅनडाशीं बोलणीं सुरू केलीं आहेत. गेल्या वर्षीं कॅनडानें अमेरिकेबरोबर पुरवठ्याचा एक करार करण्याची तयारी दाखविली होती. त्या कराराप्रमाणें अमेरिकेच्या नेहमीच्या आयातीपेक्षा २,२०,००० टन अधिक अल्युमिनम देण्यास कॅनडा तयार होता.

**अमेरिकन तज्ज्ञ आले**—भारतामधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यास मदत करण्यासाठीं म्हणून ४० अमेरिकन शेतकी तज्ज्ञ भारतांत आले आहेत. त्यांपैकीं कांहीं पूर्वींच भारतांत काम करीत होते. परंतु भारताला ५ कोटी डॉलर्सची मदत देण्याचा करार झाल्यावर आणखी कांहीं तज्ज्ञ आले. भारताला मिळणारी मदत जून, १९५२ मध्यें संपणार आहे. परंतु त्यानंतरहि एक वर्षभर अधिक मदत मिळण्याचा संभव आहे.

**मच्छीमारीसाठीं अधिक बोटी**—प. बंगाल सरकारजवळ खोल समुद्रांत मच्छीमारी करण्याच्या दोन बोटी आहेत. परंतु त्या अपुऱ्या पडत असल्यामुळें आणखी ५ बोटी सरकार खरेदी करणार आहे. पहिल्या दोन बोटींना ६·६३ लाख रुपये पडले होते. त्यांनीं मच्छीमारीसंबंधी जी माहिती मिळविली त्यावरून ह्या धंद्यांत किफायतशीर रीतीनें खाजगी भांडवल गुंतविणें शक्य आहे, असें दिसून आलें आहे.

**अमेरिकेंतील आयुर्विमा व्यवसाय**—१९५० सालीं अमेरिकेंतील नागरिकांनीं ३,००० कोटी डॉलर्स किंमतीचीं नवीं आयुर्विमा पत्रकें घेतलीं. आतां एकूण विमापत्रकांची दर्शनी किंमत २६,४०० कोटी डॉलर्स इतकी मोठी झाली आहे. अमेरिकेंतील प्रत्येक पांच कुटुंबांपैकीं ४ आतां विम्यानें संरक्षित अशीं झालीं आहेत. बचत आणि संरक्षण ह्यांसाठीं अमेरिकेंत विम्याचा सर्वांत अधिक उपयोग केला जातो.


थोड्या वेळांत
कमी खर्चांत
काम करण्यासाठीं वापरा
हातोडे :
विशिष्ट पद्धतीनें ताव दिलेल्या पोलादापासून तयार केलेले विविध आकारांचे घण, पाथरवटांचे हातोडे, मोठ-मोठ्या मेखा व मोठे खिळे ठोकण्याचे हातोडे, तसेच लहान लहान कामाच्या हातोड्या.
टिकाव व कुदळ्या :
टिकाव व कुदळ्या.
मजबूत केलेल्या अति तीक्ष्ण टोकामुळें कार्यक्षमता वाढते.
मजबूत व टिकाऊ
टाटा ॲग्रिको
अवजारें
दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील कं० लि०
सेल्स ऑफिस :
२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता
शाखा :—मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, कानपुर,
सिकंदराबाद, विजयनगरम् कॅन्टोनमेंट, जलंदर कॅन्टोनमेंट.

# अर्थ

बुधवार, ता. ३० जानेवारी, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुदती पतपत्रिकांच्या रीडिस्कौंटची योजना

### १७ ( ४ ) ( क ) कलमाखालील कर्जें

भारतांत 'बिल मार्केट'चा अभाव आहे आणि त्यामुळें व्यापारी हुंड्या रीडिस्कौंट करण्याची प्रथा नाहीं. गरजेप्रमाणें बँकेचें कर्ज उपलब्ध करून मिळावें व गरज संपतांच कर्ज फिटलें जाऊन हिशेब पुरे व्हावे आणि बँकांना आवश्यकतेप्रमाणें मध्यवर्ती बँकेकडून पतपत्रिकांच्या आधारावर तात्कालिक कर्ज मिळावें, अशी येथें संघटित व्यवस्था नाहीं. ही परिस्थिति सुधारण्याची भाषा आज कैक वर्षें चालू आहे, परंतु प्रत्यक्ष कृति अद्याप झालेली नव्हती. आतां मात्र परिस्थितीचेंच दडपण आल्याकारणानें, ह्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास विलंब करणें अशक्यच झालें. बँकांजवळील रोखे पूर्वींपेक्षा बरेच कमी झालेले आहेत; गेल्या दोन-तीन वर्षांत ते कमी-कमी होत गेले आहेत. कर्जाची मागणी पुरी पाडण्यासाठी त्यांना आपली रोख्यांतील गुंतवणूक कमी करणें भाग पडलें, आणि जुनीं कर्जें परत होण्याचें प्रमाण कमी झाल्याकारणानें १९५०-५१ च्या मोसमांत कर्जें देण्यासाठी त्या वेळीं विकलेले सर्व रोखे पुन: विकत घेणें बँकांना शक्य झालेलें नाहीं. म्हणजे दिलेलीं कर्जें भरपूर, परंतु रोखे अगदी आवश्यक तेवढेच, अशी आजची स्थिति आहे. बँकांना कांहीं किमान रक्कम रोख व निर्बंध रोख्यांत ठेवावी लागत असल्यानें रक्कम उभी करण्यास आतां पुरेसे शिल्लक आणखी रोखे बँकांजवळ नाहींत. केवळ सरकारी रोख्यांच्याच तारणावर बँकांनीं कर्जें उभारावयाचीं, तर नवीं कर्जें देणें त्यांना कठीण जाईल आणि पैशाच्या बाजारांतील तंगी भयंकरच वाढेल. बिल मार्केट शक्य तितक्या सत्वर अस्तित्वांत येणें हाच त्यावर प्रभावी उपाय आहे.

रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ ( ४ ) ( क ) कलमाप्रमाणें तिला शेड्यूल्ड बँकांना ९० दिवस पर्यंतच्या मुदतीच्या हुंड्यांचे तारणावर कर्जें देण्याचा अधिकार आहे. ह्या हुंड्यांस खरोखरीच्या व्यवहाराचा पाया असला पाहिजे, त्यांवर किमान दोन चांगल्या सह्या पाहिजेत, त्यांतील एक सही शेड्यूल्ड बँकेची पाहिजे, असें त्या कलमांत सांगितलें आहे. ह्या कलमाप्रमाणें कर्जें देण्याची तयारी रिझर्व्ह बँकेनें आतां जाहीर केली आहे. शेड्यूल्ड बँकांनीं आज कर्जें, ओव्हरड्राफ्टस व कॅश क्रेडिटस् हीं डिमांड प्रॉमिसरी नोटांवर दिलीं असणार. तेव्हां त्यांना रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेण्यासाठीं त्यांपैकीं कांहींचें रूपांतर ९० दिवसांत पटणाऱ्या पतपत्रिकांत करावें लागेल. शेड्यूल्ड बँकांनीं भारतांत कोठेंहि कर्ज दिलें असलें, तरी त्या कर्जास तारण असलेल्या बिलांचे तारणावर रिझर्व्ह बँक आपल्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व कानपूर येथील कचेऱ्यांमार्फत शेड्यूल्ड बँकांना कर्जें देईल. जी शेड्यूल्ड बँक रिझर्व्ह बँकेकडे ह्या पद्धतीनें कर्ज मागेल, तिच्या कार्यपद्धतीचा विचार करूनच रिझर्व्ह बँक कर्ज मंजूर करील; कारण न देतां कोणत्याहि बँकेकडून आलेलीं बिलें नामंजूर करण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार आहे. बिल मार्केटच्या वाढीस उत्तेजन मिळावें म्हणून १७ ( ४ ) ( क ) ह्या कलमाखाली जीं कर्जें दिलीं जातील, त्यांवर व्याजाचा दर बँकरेट पेक्षा अर्धा टक्का कमी, इतका स्वल्प राहील. अर्थात, अशा कर्जास खूपच मागणी आली तर मुद्दाम उत्तेजन देण्याचें कारण उरणार नाहीं व व्याजाचा दर वाढविला जाईल. वर सांगितल्याप्रमाणें डिमांड प्रॉ. नोटांचें टाइम बिलांत रूपांतर करण्यासाठी जी स्टँप ड्यूटी पडेल तिच्या निम्मी ड्यूटी रिझर्व्ह बँक देईल, असेंहि जाहीर करण्यांत आलें आहे. बिल मार्केटच्या निर्मितीच्या प्रोत्साहनासाठींच हें करण्यांत येत आहे.

१७ ( ४ ) ( क ) ह्या कलमाखालील कर्जाचा मुख्य उद्देश मोसमांत निर्माण होणारी पैशाची टंचाई दूर करणें हा आहे. म्हणून, शेड्यूल्ड बँकेनें रिझर्व्ह बँकेकडून ह्या कलमाप्रमाणें कर्ज घ्यावयाचें, त्याची प्रत्येक वेळीं किमान रक्कम २५ लक्ष रुपये तरी असली पाहिजे. त्याचप्रमाणें, शेड्यूल्ड बँकांनीं तारण म्हणून द्यावयाच्या प्रॉ. नोटा किंवा हुंड्या ह्यांची प्रत्येकी रक्कम किमान १ लक्ष रुपये असली पाहिजे. ह्या किमान मर्यादा पाहिल्या, म्हणजे फक्त कांहीं अगदी मोठ्या बँकांसच प्रस्तुत योजनेचा फायदा घेता येईल, हें स्पष्ट दिसून येतें. कर्जें देतांना रिझर्व्ह बँक स्वतःच्या सुरक्षिततेकडे पहाणार, हें उघडच आहे. तेव्हां, कर्जें मंजूर करण्यास प्रारंभीं तरी विलंब लागेल, हें स्पष्ट आहे. कारण, पुरी चौकशी करण्यास वेळ लागणारच. तथापि शेड्यूल्ड बँकेला तातडीनें कर्ज हवें असेल तर तिनें तें प्रथम सरकारी रोख्यांच्या तारणावर बँक रेटनें घ्यावें व रिझर्व्ह बँकेनें चौकशी पुरी करून १७ ( ४ ) ( क ) कलमाखाली तें मंजूर केलें म्हणजे तें बँक रेटपेक्षा अर्धा टक्का कमी दराच्या व्याजाच्या त्या खातीं वर्ग करावें, असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे. ह्या योजनेच्या अमलबजावणीचा जसजसा अनुभव येईल, तसतसे कर्जाचे अर्ज सत्वर निकालांत काढणें शक्य होईल; तेव्हां शेड्यूल्ड बँकांनीं ह्या बाबतींत हार्दिक सहकार्य करावें अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे.

मोठ्या शेड्यूल्ड बँका व त्यांचे कांहीं निवडक कर्जदार, ह्यांचे दृष्टीनें वरील योजना ठीक आहे. ह्या बँका तागाच्या गिरण्यांसारख्या मोठ्या कर्जदारांचें १ कोटी रु. चें कॅश क्रेडिट ७५ लक्ष रुपयांवर आणून उरलेले २५ लक्ष रु. त्यांनीं बिलांच्या तारणावर घ्यावे, असें म्हणूं शकतील. त्या प्रमाणांत बिल मार्केट निर्माण होईल, बिलें स्वल्प व्याजानें रीडिस्कौंट होतील व त्यांची पैशाची टंचाई दूर होईल. बिगर-शेड्यूल्ड बँका तर राहोच, परंतु मध्यम आकाराच्या शेड्यूल्ड बँकांनाहि ह्या योजनेचा फायदा घेतां येणार नाहीं व त्यांना पैसा उभारण्यासाठी सरकारी रोख्यांचेंच तारण पूर्ववत् देत रहावें लागेल. मोसमांतील पैशाची टंचाई दूर करण्याच्या दृष्टीनें सोइस्कर म्हणून वैयक्तिक बिलाची किमान रक्कम १ लक्ष रुपये ठेवण्यांत आली असली, तरी त्या तंगीची झळ लागणाऱ्या बहुसंख्य व्यापाऱ्यांना व कारखानदारांना बिल मार्केटच्या ह्या योजनेचा तात्काल कांहींहि फायदा होणार नाहीं आणि बहुसंख्य बँकांना

बिलांपेक्षा अधिक भरून अशा सरकारी रोख्यांच्या तारणावर बँक रेटनेंच कर्जे काढावीं लागतील. बिलांच्या तारणावरील कर्जास प्रोत्साहन देतांना होणारा हा अन्याय लहान व मध्यम आकाराच्या बँकांस जाचक होईल, अशी भीति वाटते. कर्जदाराला कॅश क्रेडिटपेक्षा बिलांच्या तारणावरील कर्ज स्वस्त पडलें पाहिजे. कॅश क्रेडिटचा दर बँक रेट + १% ( किमान ६% ) असेल तर बिलांच्या तारणावरील व्याजाचा दर बँक रेट + ½% ( किमान ५½%) असा पडला पाहिजे. केवळ शेड्यूल्ड बँकेस ½ टक्का कमी दरानें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळून भागणार नाहीं. जी बिलें रिझर्व्ह बँक रीडिस्कौंटसाठी पत्करणार, यांचे बाबत तिनें फाजिल चिकित्सा करूं नये; सही करणाऱ्या शेड्यूल्ड बँकेवर जरा अधिक विश्वास ठेवावा, असेंहि सुचविण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें, बिलें रीडिस्कौंट करणाऱ्या बँकेची पत कोणत्याहि प्रकारें कमी प्रतीची आहे, अशा समजुतीस थारा मिळता कामा नये. बिल मार्केटची निर्मिति ही मूळ कर्जदारापासून थेट सबंद राष्ट्राच्या आर्थिक संसारास पोषक होणारी गोष्ट आहे, ह्या जाणिवेनेंच योग्य प्रयत्न झाले पाहिजेत.

---

## भारतांतील उद्याचे उद्योगपती

### नवशिके कारखानदार, अस्पष्ट योजना व साधनसंपत्तीचा अभाव

संयुक्त प्रांत सरकारचे, लहान आकाराच्या उद्योगधंद्यांचे सल्लागार ( डिसेंबर, १९५० अखेर ) मि. पॉल टेल्को, ह्यांनीं भारतामधील आजचे कारखानदार म्हणजेच उद्याचे उद्योगपती, ह्यांचें चित्र रेखाटलें आहे, तें मोठें उद्बोधक आहेः— कांहीं मोठ्या शहरांतील जुने कारखानदार सोडले, तर बाकीचे बहुतेक सर्व नवशिकेच आहेत. पाकिस्तानांतून निसटून आलेले जुने बुकसेलर, जमीन सुधारणा कायद्यामुळें संपत्ति ज्यांची जात चालली आहे असे जुनेपुराणे जमीनदार, पैसे कमावलेले व्यापारी, घरचें किडूक मिडूक मोडून कारखानदारींत कांहीं मिळतें का पहावें, अशी आशा धरणारे बेकार वकील–डॉक्टर, सरकारी कर्ज मिळण्याची आशा असणारे धडाडीचे तरुण, अशा विविध प्रकारचे लोक कारखान्यांत भांडवल गुंतवूं पहात आहेत. औद्योगीकरणामुळें भारत समृद्ध होईल असें भाषणांतून व लेखांतून सांगण्यांत येतें आणि ह्या समृद्धींत भागीदार होण्याची आकांक्षा ह्या सर्वांना असते.

छत्रीच्या काड्या, कॉस्टिक सोडा किंवा हातकंदील आपण तयार करणार, असे उद्याचे हे उद्योगपती ठरवतात. त्यासाठी कोणती यंत्रसामुग्री लागेल, ह्याची त्यांना नीटशी कल्पनाहि नसते, परंतु त्या यंत्रसामुग्रीसाठी ते जगभर चौकशा सुरू करतात. "मी दंतवैद्य आहे. मला स्क्रू तयार करण्याचा कारखाना काढावयाचा आहे. त्या धंद्यांत फायदा होईल, असें म्हणतात, तेव्हां त्याला लागणारी यंत्रसामुग्री तुम्हीं पुरवाल काय? मला किती भांडवल लागेल?" असें एकादा इंग्रज दंतवैद्य इंग्लंडमध्यें विचारूं लागला तर त्याला मूर्खांत काढतील. भारतांत अशा प्रकारच्या चौकशाच ज्यास्त असतात! त्यांत विशेष कांहीं आहे, असें कोणी मानणार नाहीं. तेव्हां "घरीं परत जा आणि नीट विचार करून मग ये," असें हिंदी दंतवैद्याला सांगितलें तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं; त्याचें मन बदलणार नाहीं. कित्येक महिने तो त्याचा विचार करीत आहे आणि त्या विषयीं बोलत आहे; त्याचें मत पक्कें बनलें आहे. कहीं तरी धडपड करून, येन केन प्रकारेण तो स्क्रूचा कारखानदार बनणारच. प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव असलेला भागीदार घे, असें त्याला सांगण्याचा कांहींहि उपयोग नाहीं: त्याचा मेहुणा, सेवानिवृत्त बॉयलर इन्स्पेक्टर, एम. ए., बी. कॉम., कोणास तरी त्यानें भागीदार म्हणून अगोदरच निवडलेला आहे. इंजिनिअरचा सल्ला घेण्याची सूचना त्याला करण्यांत अर्थ नाहीं. ह्या हिंदी कारखानदाराजवळ कन्सल्टिंग इंजिनिअर कधींच नसतात. शेकडो मैल दूरच्या औद्योगिक शहरांतील सल्लागार त्याचेकडे नेलेल्या विविध अडचणी दूर करण्याइतके हरहुन्नरी नसतात. त्यांची फी देणें छोट्या कारखानदारास परवडतहि नाहीं. तज्ज्ञ इंजिनिअरनें जरी टूल्स व जिग्जचीं चित्रें व नकाशे पुरविले, तरी हिंदी मशीन टूल्सचे कारखानदार ते सहजी पुरवूं शकणार नाहींत.

भारतास लागणारी यंत्रसामुग्री जपानमधून का आयात केली जाते, ह्याचीं कारणें सांगतांना मि. पॉल टेल्को ह्यांनीं हिंदी कारखानदाराचें वरीलप्रमाणें चित्र रंगविलें आहे. त्या कारखानदारास हवी असलेली यंत्रसामुग्रीच केवळ विकून भागत नाहीं, तर त्याच्या कारखान्याची योजना आखून देऊन त्याच्या उत्पादनाचें कामींहि सहाय्य करावें लागते. जपानी लोक हें करतात, त्यासाठी समक्ष जागेवर येऊन सर्व आंखणी करून देतात आणि उत्पादनाची जणूं कांहीं हमीच घेतात. ब्रिटिश कारखानदारांना अशा गिऱ्हाइकाची अद्याप संवय झालेली नाहीं. त्यांना वाटतें, कीं कारखानदारांनींच त्यांच्या स्वतःच्या उत्पादनाची सर्व आंखणी करावी! गैरमाहीतगार व शिकाऊ अशा हिंदी छोट्या कारखानदारांच्या गरजा जपाननें बरोबर ओळखल्या आहेत आणि म्हणून ब्रिटिश यंत्रें जपानी यंत्रांपेक्षां चांगलीं असलीं, तरी जपानी लोक यंत्रें चालविण्याचेंहि निम्में काम करीत असल्यानें भारतीयांना जपानी यंत्रें व यंत्रविशारद ही अधिक सोईचीं वाटतात. हिंदी नव्या छोट्या कारखानदारांना कांहींच कळत नाहीं असें म्हणून त्यांचेकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. अखेर तेच लोक, हजारों चुका करून का होईना, छत्र्याच्या काड्या, कॉस्टिक सोडा व हातकंदील बनविणार. प्रश्न एवढाच, कीं त्यांत जपान भागीदार होणार, का ग्रेट ब्रिटन? असा प्रश्न मि. टेल्को ह्यांनीं विचारला आहे.

---

**लेनिनच्या स्मृतिदिनीं अधिक काम**—२१ जानेवारीला रशियांत लेनिनच्या स्मृतिदिनानिमित्त सुट्टी असे. परंतु चालू वर्षीं ती मिळाली नाहीं. त्या दिवशीं उलट अधिक काम व उत्पादन करण्याच्या स्पर्धा कामगारांत लावण्यांत आल्या. रशिआंतील तीन महत्त्वाच्या सुट्ट्यांपैकीं ही एक सुट्टी होती. दुसऱ्या दोन सुट्ट्या म्हणजे मे दिनाची आणि ऑक्टोबर क्रांतीची, ह्या होत.

**क्षयरोग्यांविरुद्ध इलाज**—क्षयरोगाची भावना झाली आहे अगर नाहीं तें पहाण्यासाठीं भारतामधील ५९·७ लाख लोकांची मुद्दाम तपासणी करण्यांत आली होती, त्यापैकीं जवळ जवळ १९ लाख लोकांना बी. सी. जी. हें क्षयरोग प्रतिबंधक औषध टोचण्यांत आलें, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**भारत–मलाया व्यापार**—भारत आणि मलाया ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारासंबंधींचे १९५१ च्या पहिल्या नऊ महिन्यांतील आकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यावरून उभय देशांच्या व्यापारांत वृद्धि हात असल्याचें दिसतें. १९५० च्या पहिल्या नऊ महिन्यांत भारतानें आयातीपेक्षा ८२·७ मलायी लक्ष डॉलर्स किंमतीचा माल मलायाला अधिक निर्यात केला होता. १९५१ सालीं हाच आकडा ९१·९ लक्ष मलायी डॉलर्स आहे.

### एक रुपयाच्या नवीन नोटेचें वर्णन

' भारत सरकारच्या एक रुपयाच्या नवीन चलनी नोटा २५ जानेवारी, १९५२ पासून रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यांतून मिळूं लागल्या. नवीन नोटेंतील महत्त्वाचे बदल म्हटले म्हणजे एक रुपयाच्या नाण्याचें त्यावरील चित्र व त्या नोटेची किंमत दर्शवितांना इंग्रजी व हिंदी यांना दिलेलें सारखेंच प्राधान्य, हे होत. नवीन नोटेचें थोडक्यांत वर्णन पुढीलप्रमाणें आहे:—

आकार— नोटेची लांबी ४" व रुंदी २॥" आहे.

कागद— हा कागद सांचांतून तयार केलेला असून त्याची जाडी ३॥ ते ४ हजारांश इंच आहे. नोटेवरील जलचिन्हांत अशोकस्तंभाचें चित्र आहे.

वरील बाजू— नोटेवर उजव्या हाताच्या कोपऱ्यावर करड्या रंगांत अशोकस्तंभ असलेल्या १९५१ च्या रुपयाच्या नाण्याच्या मुखवटयाची बाजू चित्रित केली आहे. डाव्या बाजूस जलचिन्हाची कोरी जागा असून त्याच्या सभोवती वरच्या बाजूस नक्षीकाम आहे व खालच्या बाजूस कमलांकृतियुक्त किनार आहे. एका चौकटींत ' गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया ' अशीं अक्षरें ठळक अक्षरांत छापलीं असून त्या चौकटीमुळें रुपयाच्या नाण्याचें चित्र व ही जलचिन्हाकृति जोडली गेलीं आहेत. नोटेची सर्व आकृति त्याच करड्या रंगांत आहे.

नोटेच्या मध्यभागीं फिकट हिरव्या व भडक बदामी रंगांत नोटेची एक रुपया ही किंमत सारख्याच प्राधान्यानें हिंदी व इंग्रजींत दिली आहे. त्याचप्रमाणें नोटेच्या उजव्या व डाव्या हाताच्या कोपऱ्यांत १ हा आंकडाही छापलेला आहे. इंद्रधनुष्याप्रमाणें पोपटी, नारिंगी, हिरवा, निळा व अंजिरी या विविध रंगांच्या संमिश्र छटांत ही नोट छापण्यांत आली आहे. यामध्यें उजव्या हाताच्या खालच्या कोपऱ्यांत एक रुपयो हीं अक्षरें फिकट रंगांत दिसतात.

या नोटेवरील अनुक्रमांक रिझर्व्ह बँकेच्या नोटेवरील क्रमांकाप्रमाणें काळ्या रंगांत ठळकपणें छापलेला असून, अर्थखात्याचे चिटणीस श्री. के. जी. आंबेगांवकर यांची स्वाक्षरी ' एक रुपया ' या अक्षरांच्या वर करड्या रंगांत आहे. नवीन नोटांवरील क्रमांकाच्या मागें $\frac{A}{O}$ अशीं आद्याक्षरें आहेत.

मागील बाजू— डाव्या हाताच्या वरच्या कोपऱ्यांत पुढील बाजूप्रमाणेंच करड्या रंगांत रुपयाच्या नाण्याची मागील बाजू असून त्याच्या जोडीस पर्णाकृती नक्षींच्या दोन चौकटींत हिंदी व इंग्रजीमध्यें सारख्या आकारांत एक रुपया अशीं अक्षरें एका खालीं एक आहेत. उजव्या बाजूस स्पष्ट दिसणारी जलचिन्हाची कोरी जागा आहे. नोटेच्या मध्यभागीं ' गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया ' या ठळक अक्षरांच्या चौकटीखालीं बंगाली, गुजराती, कानडी, ओरिया, तामीळ, तेलगु व उर्दू या भाषेंत करड्या रंगांतच नोटेची अक्षरी किंमत दिली आहे. १ हा आंकडा डाव्या व उजव्या बाजूंच्या वरच्या कोपऱ्यांत छापलेला आहे. नोटेची सर्व आकृति करड्या रंगांतील नागमोडी वळणाच्या चौकटींत असून त्यावर निळ्या, नारिंगी, बदामी व हिरव्या रंगाचें इंद्रधनुष्य आहे.

### दि बँक ऑफ इंडिया लि.

दि बँक ऑफ इंडिया लि. ला १९५१ मध्यें ७९·५ लक्ष रु. नफा झाला आहे. १९५० मधील नफा ७५ लक्ष रु. होता. वाढविलेल्या भांडवलावर ८% डिव्हिडंड मिळणार आहे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा : ३, ५, १० वर्षे सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकिटें
१ माहीम दर ९३–८, ८७–८, ७५ अनुक्रमें.
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.


### सरकारी मालकीच्या कारखान्यांवर एकसूत्री देखरेख

सरकारी मालकीच्या सर्व कारखान्यांचें काम एकसूत्री करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्यानें एक अधिकारी नेमावा, असें ठरलें आहे व त्याप्रमाणें जॉइंट सेक्रेटरी श्री. भट्टाचार्य ह्यांची नेमणूक झाली आहे. बांधकाम–उत्पादन–पुरवठा खात्याचे ते आर्थिक सल्लागार म्हणून काम करतील. सिंद्री खत कारखाना कलकत्ता येथील गणितविषयक साधनांचा कारखाना, बंगलोर येथील मशीन टूल कारखाना, कलकत्ता येथील ड्राय केबल कारखाना, आणि नव्यानें स्थापन झालेलें हिंदुस्तान शिपयार्ड, ह्या सर्वांची व्यवस्था व नियंत्रण भारत सरकारकडे आहे.


# NOTICE

**THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED**

Notice is hereby given that the seventeenth ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra, Ltd. will be held at the Registered Office of the Bank, Kakakuva Mansion, Laxmi Road, Poona City on Sunday the 24th day of February, 1952, at 4. P. M. (S. T.) to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Report of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1951.

*(2) To declare a Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the chairman.

Poona City, 27th January, 1952 — By order of the Board C. V. Joag, Manager.

*N. B.*—The Share Transfer Books of the Bank will be closed from Wednesday, the 20th day of February, 1952 to Friday, the 29th day of February, 1952, both days inclusive.

*** The Dividend, when declared, will be payable on and after Saturday, 22nd March, 1952 and the Dividend Warrants will be posted to the Registered Addresses of the Share-holders. *Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.***

फोन: ३७५११ तार: SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना**

असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

ग. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,६५,००० |
| ठेवी | रु. ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७९,००,००० |


**मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :**

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन





## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## सहकारी क्षेत्रांतील शब्दसंपदेंत भर

आमदार श्री. पु. पां. गोखले व श्री. वा. चिं. भानु ह्यांनीं सहकारी संस्थांच्या नित्य कामकाजांत प्रचारांत असलेल्या तांत्रिक इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द ' सहकारी जगत् ' मध्यें सुचविले आहेत; मूळ इंग्रजी शब्दांचा सर्व अभिप्रेत अर्थ चांगल्या प्रकारें व्यक्त व्हावा व प्रतिशब्द सुटसुटित असावा, ह्या दृष्टीनें खालील त्यांच्या यादीकडे पाहिलें पाहिजे.

| मूळ इंग्रजी शब्द | श्री. गोखले ह्यांनीं सुचविलेला शब्द | श्री. भानू ह्यांनीं सुचविलेला शब्द |
|---|---|---|
| Director | | आदेशक |
| Managing Director | प्रबंध निर्वाहक | कार्यकारी आदेशक |
| Board of Directors | नियामक मंडळ | आदेशक मंडळ |
| Manager | | व्यवस्थापक |
| Assistant Manager | सह प्रबंधक | नायब व्यवस्थापक |
| Inspector | परिदर्शक | तपासणीस, तपासणी अंमलदार |
| Senior Inspector | पूर्व नियुक्त | ज्येष्ठ तपासनीस „ |
| Junior „ | उत्तर नियुक्त | कनिष्ठ „ „ |
| Accountant | गणक | हिशेबनवीस |
| Chartered | राज्य संमत | सरकारमान्य, सरकारपुरस्कृत |
| Marketing Inspector | सौदे तपासनीस | बाजार तपासनीस |
| Agent | | मुनीम, गुमास्ता |
| Cashier | | रोकड्या |
| President | | अध्यक्ष |
| Managing Committee | | व्यवस्थापक समिति |
| Auditor | लेखा परीक्षक | हिशेब तपासनीस, हिशेब–समीक्षक |
| Audit note | लेखाधीक्षा | तपासणी शेरा |
| Audit memo | लेखा समीक्षा | तपासणी यादी |
| Proceeding | क्रमसारिणी | इतिवृत्त, सभावृत्त |
| Notice | चेतनी | इषारा, इशारत, सूचना |
| Qualified | पात्रता सिद्ध | लायक |
| Multipurpose Society | विविध प्रयोजन मंडळ | विविध कार्यकारी मंडळी |
| Budget | अर्थ संकल्प | अंदाज-पत्रक |
| Assets | धन संस्थिर्ते | येणीं, जिंदगी |
| Liabilities | ऋण संस्थिर्ते | देणीं, कर्जे |
| Limited | परिसीमित | समर्याद जबाबदारी |
| Unlimited | | अमर्याद „ |
| Valuation | मोल माप | मूल्यमापन |
| Investments | विन्यास | उत्पादक ठेवणी |
| Fluid resource | तरतें भांडवल | हुकमी तरतूद |
| Suspense Account | चलगणना | अनामत खातें |
| Up to date | तारिख तागायत | अद्यावत् |
| Bad Debt | थक बाकी | बुडित कर्जे |
| Dead Stock | बे वापर वाण | जंगम सामान |
| Cash Credit | नगद पत | नगदी पत |

| मूळ इंग्रजी शब्द | श्री. गोखले ह्यांनीं सुचविलेला शब्द | श्री. भानू ह्यांनीं सुचविलेला शब्द |
|---|---|---|
| Pass-Book | दर्शनिका | खातें उतारा |
| Rebate | प्रत्यादान | कसर |
| Credit Voucher | | जमा चलन |
| Debit Voucher | | नांवे चलन |
| Overdues | | थक बाकी |
| Providend Fund | निर्वाह निधी | तरतूद निधी (सेवकांचा) |
| Cheque | | चेक |
| Demand Draft | | डिमांड ड्राफ्ट |
| Credit Worthiness | साख साधन | पतपात्रता |
| Banker | महाजन | पेढीवाला |
| Index Card | व्यवहारतका | सूचिपत्र |
| Commodity of war-quality | रणरंगत वस्तुमात्र | तकलुपी |

## मुंबई प्रां. सहकारी बँकेची संत्रामपूर (पंचमहाल) शाखा

### प्रांतिक बँकेचें कर्जपुरवठ्यांतील महत्त्वाचें स्थान
### डे. रजिस्ट्रारचें भाषण

मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या संत्रामपूर ( पंचमहाल जिल्हा ) शाखेचा उद्घाटन समारंभ १५ जानेवारी रोजीं पार पडला. त्या वेळीं सुमारें १०० निमंत्रित उपस्थित होते. बँकेच्या सीनिअर इन्स्पेक्टरांनीं बँकेचा इतिहास थोडक्यांत निवेदन केला आणि श्री.ठक्कर बाप्पांच्या वेळेपासून तिचा भिल्ल सेवा मंडळाशीं असलेला निकट संबंध स्पष्ट करून सांगितला. श्री. तेरासिंहभाई, डेप्युटि रजिस्ट्रार, असि. राजिस्ट्रार, श्री. जे. पी. परेख, श्री. किशोरसिंह परमार, श्री. ईश्वरलाल के. देसाई, मामलेदार, इत्यादींचीं समयोचित भाषणें झालीं. डेप्युटी रजिस्ट्रार, श्री. छगनभाई पटेल, ह्यांनीं प्रांतिक सहकारी बँकेच्या आर्थिक सामर्थ्याचें व तिचेवरील जनतेच्या विश्वासाचें वर्णन केलें. जिल्हा बँका व किंवा बँकिंग यनियन्स काढण्यापेक्षां, प्रांतिक बँकेच्या शाखा काढणें त्यांना अधिक श्रेयस्कर वाटलें. तिचें आर्थिक सामर्थ्य जास्त असल्यानें, ती शेती व बिगर शेतीविषयक भांडवलाच्या गरजा चांगल्या तऱ्हेनें पुरवूं शकते. ध्येय या दृष्टीनें जिल्हा बँका व बँकिंग यूनियन्स ठीक आहेत, परंतु प्रगत काळाच्या गरजेच्या दृष्टीनें त्या अपुऱ्या पडतात, असा त्यांचा अनुभव असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्या संस्थांजवळ पैसा बेताचाच असतो व त्यांना प्रांतिक बँकेकडेच कर्जासाठीं जावें लागतें. प्रांतिक बँकेचा कारभार, धोरणाची सुसूत्रता आणि इतर गोष्टीहि चांगल्या आहेत. सोसायट्यांशीं एकनिष्ठ राहून कर्जफेड वक्तशीर करण्याचा उपदेश त्यांनीं शेतकऱ्यांना केला.

अध्यक्ष, श्री. डाह्याभाई, जे. नाईक, ह्यांनीं प्रांतिक बँकेची वटवृक्षाशीं तुलना केली. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं सहकारी चळवळीच्या केलेल्या बहुमोल सेवेचा त्यांनीं गौरवपर उल्लेख केला आणि सहकारी चळवळीच्या वाढीसाठीं सध्याच्या संचालकांच्या प्रगतिप्रिय धोरणाबद्दल प्रशंसा केली. बँकेच्या मॅनेजरांचा संदेश सभेच्या प्रारंभीं वाचून दाखविण्यांत आला होता.

---

### महाड संघाचा टे. पत्ता

महाड ता. खरेदी–विक्री संघास नुकताच टेलिग्रॅफिक पत्ता मिळाला आहे तो " SAHAKAR " असा आहे.

## सहकारी सेक्रेटरीच्या कार्याचें महत्त्व

### आचार्य जावडेकरांचें भाषण

कृ० सातारा जिल्हा को. बोर्डाचे विद्यमानें इस्लामपूर येथें ता. १५।१।५२ रोजीं सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ आचार्य शंकरराव जावडेकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्या वेळीं बोर्डाचे चेअरमन श्री. भाऊसाहेब बाळासाहेब पाटील, श्री. नानासाहेब कृष्णाजी पाटील, को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. डी. बी. निकम, श्री. ना. कृ. पाटील, इत्यादींचीं भाषणें झालीं. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले:–"या चळवळीची वाढ करण्याची जबाबदारी आपल्या कार्यकर्त्यांवर येऊन पडली आहे. तें कार्य एकट्या सेक्रेटरीकडून होणार नाहीं. सर्व जनतेनें तो भार उचलला पाहिजे. संस्था सेक्रेटरीला पगार देते म्हणून त्याला कमी लेखूं नये. तो पगारदार नोकर आहे म्हणून त्याची अवहेलनाहि करूं नये. त्याला योग्य तो मान द्यावा व तसा जर मान दिला गेला नाही तर उत्तम समाजसेवक मिळणार नाहींत, याची संस्थेनें जाणीव ठेवावी. सेक्रेटरीनें कायदा मोडूं नये व स्वार्थाकडे अजिबात लक्ष देऊं नये. जर कोणी मेंबर त्याच्यावर वजन आणून कायदा मोडणें भाग पाडत असेल तर व त्यामध्यें सेक्रेटरीचा स्वार्थ साधणार असेल तरीहि त्यानें त्या मोहास बळी पडूं नये. त्यानें त्या मेंबरास आपलें स्पष्ट मत कळवावें. मग त्यांनीं बहुमतानें ती गोष्ट केली तरी ते ती करूं देत. बहुमतानें कोणतीहि गैरकायदा गोष्ट केली तर ती कायदेशीर होऊं शकत नाहीं, याची सेक्रेटरीनें जाणीव ठेवून आपण आदर्शभूत समाजसेवक व्हाल अशी मी इच्छा करतो."

### ओरिसामधील शेतमजुरांची स्थिति

भारत सरकारच्या मजूर खात्यानें ओरिसा राज्यांतील शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीवर विदारक प्रकाश टाकला आहे. ओरिसा राज्यांतील खुंटानी भागांत ह्यासंबंधीं आंकडेवार माहिती जमविण्यांत आली.:ज्यांना स्वतःचीं शेतें नाहींत अशा प्रत्येक १३ कुटुंबांपैकीं १० कुटुंबें कर्जबाजारी असलेलीं आढळून आलीं. प्रत्येक कुटुंबाच्या कर्जाची सरासरी ६० रुपयांच्यावर दिसून आली. अधून मधून शेत-मजुरी करणाऱ्या २१ कुटुंबांचीही पहाणी करण्यांत आली असतां त्यांपैकीं १४ कुटुंबें कर्जबाजारी सांपडलीं. त्यांची कर्जाची सरासरी ५० रुपये होती. ह्या शेतमजुरांचें अन्न निकृष्ट दर्जाचें व अपुरें होतें. त्यांच्या एकूण खर्चापैकीं ८१·३ टक्के त्यांना अन्नासाठीं खर्च करावा लागत होता. अन्नावर होणारा खर्च आणि इतर बाबींवर होणारा खर्च ह्यांचें व्यस्त प्रमाण लक्षांत घेतां त्यांचें रहाणीचें मान अतिशय खालच्या दर्जाचें आढळून आलें, असें अहवालांत म्हटलें आहे. गांवांतील ८६ टक्क्यांवर जमिनी व्याप्तीनें ५ एकरांपेक्षां कमी होत्या आणि ८·३ टक्के जमिनीच काय त्या १० एकरांपेक्षा मोठ्या आढळून आल्या. खुंटानी हें गांव भारत–सरकारनें आंकडे जमविण्यासाठीं जी २७ गांवें निवडलीं होतीं त्यांपैकींच एक आहे. शेत-मजुरांच्या आर्थिक परिस्थितीची आंकडेवार माहिती जमविण्यासाठीं भारत सरकारच्या मजूर खात्यानें हा उपक्रम केला होता. आंकडे जमविण्याची पद्धत कशी असावी तें ठरविण्याचा हेतु त्याच्या मुळाशीं होता. अशी माहिती जमविल्यानंतरच शेतमजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं कार्यक्रम आखतां येणें शक्य होणार आहे. वरील पद्धतीनें काम करून भारतामधील ८१२ खेड्यांची आंकडेवार पहाणी करण्यांत आली आहे.


स्थापना ] पांढऱ्या कोडावर [ १९३६

श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. ता. वाडे जि. ठाणें लिहितात:– मी कोडाकरितां पुष्कळ औषधें केलीं पण गुण आला नाहीं. सरतेशेवटीं आपलेंच प्रभावी औषधानें माझे मुलीचें संपूर्ण कोड नाहींसें झालें. अशीं शेकडों प्रशस्तिपत्रें व बक्षिसें मिळालीं. किं. रु. ५ पो. ख. १५ आणे. वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरूळपीर, जि. आकोला (वऱ्हाड)

ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९९,३८५

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B. } मॅनेजिंग डायरेक्टर.
श्री. नी. ना. क्षीरसागर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.